# बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१७

## भूगोल आणि अर्थशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
iii. प्र.३ (अ), (ब), (क) संपूर्णपणे नकाशा, आलेख पुरवणीवरच सोडवावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
iv. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
v. १ ते ४ प्रश्न भूगोलाचे व ५ ते ७ प्रश्न अर्थशास्त्रावरील आहेत.
vi. आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नकाशाचा वापर करा.

---

**१. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा. [३]**

१. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ________ हे भारतातील सर्वांत मोठे राज्य आहे.
(मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान)

२. गर्हजात डोंगरांनी ________ राज्याचा वायव्य भाग व्यापला आहे.
(महाराष्ट्र, ओडिशा, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश)

३. पश्चिम घाटात ________ हे सर्वाधिक उंचीचे शिखर आहे.
(अन्नाईमुडी, दोडाबेट्टा, अन्नामलाई, के-२)

**(ब) 'अ ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा. [३]**

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | उज्जैन | अ. | दखखनमधील उर्दू भाषेचे केंद्र |
| २. | अमृतसर | ब. | माळवा विभागाची प्राचीन सांस्कृतिक राजधानी |
| ३. | हैदराबाद | क. | थंड हवेचे ठिकाण |
| | | ड. | शिखांचे पवित्र तीर्थस्थान |

**२. (अ) भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) : [४]**

१. गंगेच्या किनारी प्रदेशात शेती हा मुख्य व्यवसाय आहे.
२. पंजाब प्रदेशातील मृदा क्षारयुक्त होत आहे.
३. मळ्यांची शेती मुख्यत: पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात एकवटली आहे.
४. लक्षद्वीप बेटांवरील पर्यटन व्यवसाय

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही दोन) : [४]**

१. भारताची सागरी सीमा
२. हिमालयाची निर्मिती
३. दखखन पठारावरील नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या

३. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे विभाजित आयत तयार करा. [२]

**कृषी उत्पादन (खरीप) दशलक्ष टन (२०१०-२०११)**

| पिके | टक्के |
|---|---|
| तांदूळ | ४३ |
| भरडधान्य | २० |
| कडधान्य | ०८ |
| तेलबिया | १४ |
| कापूस | १५ |
| एकूण | १०० |

(ब) खाली दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [२]




**प्रश्न :**

१. द्वीपकल्पीय (दखखन) पठाराचे मुख्य उपविभाग कोणते?

२. द्वीपकल्पीय (दखखन) पठारावरुन वाहणाऱ्या मुख्य पूर्व वाहिनी नदया कोणत्या?

३. गोदावरी नदीच्या उपनदीचे नाव लिहा.

४. द्वीपकल्पीय (दखखन) पठाराच्या दक्षिणेकडील टेकड्यांची नावे लिहा.

**(क) तुम्हांस पुरवलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा व त्यांना नावे द्या (सूची आवश्यक आहे ) (कोणतेही दोन) :** [२]

१. समुद्रसपाटीखालचा बिंदू

२. चंदीगढ

३. छोटा नागपूर पठार

४. अरवली पर्वत

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** [८]

१. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांविषयी सविस्तर माहिती द्या.

२. राजस्थानमध्ये लोकर उद्योगाचा विकास का झाला आहे?

३. पश्चिम घाट आणि पश्चिम किनारपट्टी पर्यटकांचे आवडते ठिकाण होण्यास कोणते घटक कारणीभूत आहेत?

**प्र.५. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** [२]

१. अर्थव्यवस्थेतील उत्पादक उपक्रम मुख्यतः ______ भागांत विभागले जातात.

(एक, दोन, तीन)

२. कमाल नफा मिळवणे हा ______ अर्थव्यवस्थेतील उत्पादकांचा मुख्य हेतू असतो.

(समाजवादी, भांडवलशाही, मिश्र)

**प्र.६. प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन):** [६]

१. श्रमप्रधान तंत्र कशास म्हणतात?

२. भाववाढीचा नैतिक मूल्यांवर कसा परिणाम होतो?

३. भाववाढ नियंत्रणाचे कोणतेही दोन प्रत्यक्ष उपाय लिहा.

४. कोणत्या कुटुंबांना केशरी रंगाची शिधापत्रिका देण्यात येते?

५. अन्नभेसळ म्हणजे काय?

**प्र.७. पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही एक):** [४]

१. वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होण्यास कारणीभूत असलेले कोणतेही चार घटक लिहा.

२. ग्राहकांचे अधिकार स्पष्ट करा.